# २० लाखांचा गुटखा हिंगोलीत जप्त

लोकमत न्यूज नेटवर्क

**आखाडा बाळापूर, (जि. हिंगोली) :** परभणी जिल्ह्यातील शिवाजी पिल्लाप्पा तिरमले या व्यापाऱ्याने गुटख्याचा साठा कळमनुरी तालुक्यातील जांब येथे सासूरवाडीतील एका शेतात लपविला होता. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने धाड टाकून हा २० लाख ६२ हजार २०० रुपये किमतीचा गुटखा जप्त केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार पोलीस अधीक्षक योगेशकुमार, स्थागुशाचे पोनि. जगदीश भंडारवार, पोनि. घेवारे, पोहेका. बोके, सोनुवणे, सावळे, थोरात यांच्या पथकाने २४ सप्टेंबर रोजी रात्री उशिरा सदर शेतात छापा टाकला.

यावेळी गोवा, वजीर नावाच्या गुटख्याच्या १२६ बॅग आढळून आल्या. हा सर्व गुटखा २० लाख ६२ हजार २०० रुपये किमतीचा असल्याचे पोलिसांनी सांगितले. या प्रकरणी बोरी (जि. परभणी) येथील शिवाजी तिरमले या व्यापाऱ्यास पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. अन्न व औषधी प्रशासन विभागाला कळविले आहे. वृत्त लिहिपर्यंत याप्रकरणी गुन्हा नोंद झाला नव्हता.



## तिरपा कटाक्ष

अनिल डांगे

